No. of Printed Pages : 7 **BMRLA–135**

# B. A. (GENERAL) (BAG)

## Term-End Examination

## June, 2024

### BMRLA-135 : MODERN INDIAN LANGUAGE– MARATHI

*Time : 3 Hours* *Maximum Marks : 100*

---

***uksV*** **:** सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.

---

1. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा : 20

(अ) झाडे लावा झाडे जगवा

(ब) अणुशक्ती आणि भारत

(क) ऑनलाइन शिक्षण सोय की गैरसोय

(ड) मायबोलीचे महत्त्व

2. पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा : 16

(अ) अक्काच्या भाऊ बहिणींजी कशी थटट्ा केली 'कातरवेळ' कथेच्या अधारे स्पष्ट करा.

(ब) साधुसंताच मोठेपण तुकारामांनी कसे केले आहे ?

(क) होनाजी बाळाने पहाटेचे रमणीय चित्रण कसे केले आहे ?

(ड) 'तुतारी' ची दीर्घ किंकाळो मनाव निनादत राहणार आहे चर्चा करा.

3. पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा : 12

(अ) तात्याची भयंकर उष्मामुळे कशी अवस्था झाली 'वळीव' कथेच्या अधारे चित्रण करा.

(ब) चेलम्याचे पाणी प्यायल्या नंतर प्रह्लादची मन:स्थिती कशी झाली ?

(क) पावसाळ्यातोल सोन्याच्या पिंपळाचे वर्णन करा.

(ड) मर्ढेकरांनी कोळसेवाल्याचे व्यक्तिमत्व कसे रेखाटले आहे ?

4. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर टीप लिहा : 12

(अ) ललितकृतींना राष्ट्रोय संपत्तीचे स्वरूप प्राप्त होते.

(ब) वसतिगृहाचे शिक्षण क्षेत्रात महत्व

(क) स्त्रियांच्या विकासाचे कार्यक्रम

(ड) संहारक्षम अण्वस्त्रे व मानवजात

5. प्रयोग म्हणजे काय ? कर्मणी प्रयोगाचे दोन उदाहरणे द्या. 10

**किंवा**

पुढीलपैकी कोणत्याही **एका** कल्पनेचा विस्तार करा :

(अ) शिक्षणातून परिवर्तनवादी चळवळोचा आरंभ.

(ब) आई जेवू घालीना, बाप भीक मागू देईना.

(क) आधी पोटोबा मग विठोबा.

(ड) जया अंगी मोठेपण तया यातना कठीण.

6. पुढीलपैकी कोणत्याही **तीन** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा : 6

(अ) आकाशपाताळ एक करणे.

(ब) हंबरडा फोडणे.

(क) विडा उचलणे.

(ड) छत्तीसचा आंकडा

**किंवा**

पुढीलपैकी कोणत्याही **तीन** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(अ) अंथरुण पाहून पाय पसरावे.

(ब) इच्छा तेथे मार्ग.

(क) कर नाही त्याला डर कशाला ?

(ड) गरज सरो, वैद्य मरो.

(इ) चोरांच्या मनात चांदणे.

7. पुढीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर लिहा : 8

(अ) स्त्रीपिषयक पारंपरिक व आधुनिक दृष्टिकोनाची चर्चा करा.

(ब) पु. ल. देशपांडे कोणतेही तिकिट कसे सांभाळतात ?

(क) भाषेच्या प्रचार प्रसारातून संस्कृतीचे जतन होते, स्पष्ट करा.

(ड) तंत्रज्ञांना, वैज्ञानिकांना, गणितज्ञांना काय वरदान ठरले, ते सिद्ध करा.

8. पुढील इंग्लीश उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 8

The process of population education should enable the learners to extend their understanding of population related issues, broaden perspective and develop appropriate skills in defining and analysing the issues.

Population education is an integral part of the overall development efforts to improve national and individual quality of life.

The population education is not a propaganda.

It is an educational approach intended to bring about an understanding of population issues, population situation and developmental processes.

9. पुढील उतार्‍याचा सारांश लिहा : 8

हास्यवदनाची थारवी फारच थोड्या लोकांना कळते. नीतिमान असावे, असा उपदेश आपल्या कानीकपाली नित्य हात असतो. पण माणसाने नेहमी सुहास्यवदन असाव, असे कोणी कोणाला सांगताना ऐकू येत नाही. तसेच म्हटले तर कट्टर कर्मठमाणसापैक्षा नेहमी हसतमुख असणारा मनुष्य अधिक योग्यतेचा असला पाहिजे. सकाळ-संध्याकाळ चार-चार घटका जपजाप्य करणारा माणूस नेहमी आंबट चेहरा करून राहत असेल व प्रत्येक

कामात चिर-चिर करीत असेल, तर त्याच्या धर्ममार्तंडत्वाप्रमाणे समाजाचे व त्याचे कोणते कल्याण होईल ? उलट सदा हसतमुख असणारा मनुष्य केवळ आपल्या सानिध्याने लोकांच्या दु:खी अतंकरणात तो आशेची उब निर्माण करील. आधीच नग हे कडू गोष्टींनी व अनुभवांनी भरलेले आहे. अनंत संकटांनी, व्याधींनी व यातनांनी गांजलेल्या या जगात दु:खी कष्टी चेहऱ्यांचा अंधार सर्वत्र पसरलेला आहे. हास्यांचे सूर्यकिरण या जगात दुर्मिळ आहेत. ते किरण जेथून प्रसृत होतील त्या चेह-याचे पावित्र्य, शेकडो धर्मक्षेत्राहून अधिक समजले पाहिजे.